# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २२/०४/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०२) इतिवृत्त

**मंगळवार, दिनांक २२ एप्रील २००८ रोजी** स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे सकाळी ११-३० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. या सभेला उपआयुक्त (म.), नगरसचिव यांचे सह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

1. श्री. संजय रामदास जोशी
2. श्री. अ. रशीद खान
3. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
4. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
5. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
6. श्री. पाटील नरवडे वसंत पांडुरंग
7. श्री. खान जावेद हसन खान
8. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
9. श्री. रविकांत काशिनाथ गवळी
10. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
11. श्री. नारायण तिलोकचंद कुचे
12. श्री. सिताराम इसराम सुरे

**विषय क्र. 02 :**

दि.**07/04/2008**(का.प.क्र.01) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. संजय जोशी : मागिल सभेचे इतिवृत्त कायम करण्यासाठी दिलेले आहे. आमचे म्हणणे आहे सभाच झाली नाही नगरसेवकांची गॅदरींग होती. गेल्या वेळेस सभापती पदाच्या निवडणुकीत पीठासीन अधीकारी म्हणून मा.महापौर बसलेले होते महापौर नसल्यास उपमहापौर यांना पिठासीन अधिकारी म्हणून बसण्याचा अधिकार आहे त्यांना न बोलवता ज्येष्ठतम सदस्य म्हणून श्री.अ.रशीद खान मामू यांना बसविले ज्येष्ठतम सदस्य पिठासीन अधिकरी म्हणून होते त्यांना मतदार करण्याचा अधिकार नसतो परंतू अ. रशिद खान मामू यांनी मतदान केले. महाराष्ट्र शासनाने 2007 सालच्या नियमाप्रमाणे स्थायी समितीच्या सभापती पदाच्या निवडणुकीसाठी महापौर किंवा उपमहापौर असावेत. हा शासनाने जो नियम काढला तो ति-हाईत व्यक्ती या ठिकाणी पिठासीन अधिकारी म्हणून असावेत. त्यांना मतदानाचा अधिकार नसावा समसमान मतदान झाले तरी चिठठया टाकून ज्यांच्या नावाचे चिठठी निघेल त्यांची निवड झाली म्हणून घोषित करण्यात यावे.असा 2007 चा कायदा असतांना सचिवांनी आणि प्रशासनाने उपमहापौरांना त्या ठिकाणी न बोलविता ज्या वेळेला महापौर सभा तहकूब करून गेले त्यानंतर उपमहापौरांना नियमाने प्राचारण करायला पाहिजे होते. हि सभा घेण्यात मी असमर्थ आहे असे महापौरांनी सुध्दा म्हटलेले नाही. त्यामुळे त्यावेळेला आपण ही जी सभा घेतली ती सभा अनधिकृत आहे असे कायद्याप्रमाणे आम्हाला वाटते आपण यांचा सचिव म्हणून उत्तर द्यावे.

श्री.अ.रशिद खान :आताच स.सदस्य श्री.संजय जोशी यांनी सभापतींना खुलासा विचारण्या ऐवजी सचिवांना विचारलेला आहे. जो पर्यत मा.सभापती आदेशीत करीत नाही तोपर्यंत सचिव खुलासा करू शकत नाही. दुसरे असे की, मी पिठासीन अधिकारी म्हणून मतदान केलेले नसून सदस्य म्हणून मतदान केलेले आहे. या संदर्भात मा.न्यायालयात प्रकरण चालू आहे त्यामूळे यावर चर्चा होणे योग्य नाही. मा.न्यायालय जो निर्णय देईल तो मान्य राहिल. या बाबतीत येथे चर्चा होवू नये ही विनंती.

मा.सभापती : म्हणणे नोंदवून घ्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.संजय जोशी : ही सभा अधिकृत झाली हेच मानायला तयार नाही. त्यामुळे सभापती म्हणून विचारणे किंवा त्यांनी सचिवांना सांगणे हे योग्य वाटत नाही.

श्री.अ.रशिद खान :आपण मा.न्यायालयात हे प्रकरण दाखल केलेले आहे तेथे जो निर्णय होईल तो होईल.

श्री.संजय जोशी :प्रशासनाचे अधिकारी म्हणून सचिव यांनी याचे उत्तर द्यावे.

श्री.अ.रशिद खान : जर कोर्टात हे प्रकरण गेले नसते त्यावेळी खुलासा विचारला असता तर ठिक होते परंतू मा. न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे तर का विचारणा होत आहे.

श्रीमती जयश्री किवळेकर:जर या प्रकरणी न्यायप्रविष्ठ प्रकरण आहे तर आपण सभा ही घेवू शकत नाही. स.सदस्य श्री.संजय जोशी यांनी जो खुलासा मागविला त्यांचा खुलासा देणे आवश्यक आहे. दि. 7-4-2008 रोजीची सभा अधिकृत झालेली नाही जर झाली असेल तर जो खुलासा विचारला आहे तो सचिवांनी द्यावा.

श्री.रविकांत गवळी :कार्यक्रम पत्रिका क्र. 2 ही जेंव्हा दोन तीन दिवसापूर्वी दिली त्यात असे दिले की 22 एप्रिल 2008 रोजी सकाळी 11-30 वाजता सभा आयोजित केली आहे. त्या अनुषंगाने आम्ही विषय क्र. 2 वर चर्चा करण्यासाठी आलेले आहे. विषय पत्रिका इतिवृत्त दाखल करण्याचे काम नगरसचिव यांचे असते त्यामूळे इतिचृत्तावर चर्चा करण्यासाठी त्यांना काही प्रश्न विचारावयाचे आहे.त्याचा खुलासा करण्यात यावा.यामध्ये आपण बोललात की हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे सदरील कोर्टाने याचिका दाखल करून घेतलेली आहे ही वैध की अवैध आहे ही सभा ठरविलेलीच नाही. जो पर्यत वैध आहे असे ठरविले जात नाही तोपर्यत अवैध आहे असे म्हणण्यास हरकत नाही. ही सभा वैध झालेली आहे का हा खुलासा करावा तसेच 7 तारखेला जेव्हा बैठक सुरू झाली त्या मध्ये असे दाखविले की 12-22 मिनिटानी तिथे अज्ञात लोकांनी येवून गोंधळ घातला त्यात काचा, खुर्च्या, माईक वगैरे तोडले इतिवृत्तात जो उल्लेख केलेला आहे त्या अनुषंगाने मी बोलत आहे. कोण सदस्य काय बोलत होते हे समजून येत नाही असे तीन वेळेस नोंद करण्यात आलेले आहे. असे असतांना फक्त स.सदस्य श्री. वसंत नरवडे पाटील श्री. दत्ताभाउ पाथ्रीकर श्री.अ.रशिद खान मामू हे काय बोलत होते हेच कसे कळत होते. बाकीचे सदस्य काय बोलत होते हे कसे समजत नव्हते.

श्री.वसंत नरवडे :बाकीचे लोक गोंधळ घालत होते.

श्री.अ.रशिद खान :आपल्याकडे कॅसेट आहे त्यात सर्व समजते.

श्री.गवळी रविकांत स्थायी समितीत एकूण 16 सदस्य आहेत. एवढ्या गोंधळात माईक तुटलेला असतांना फक्त तीन सदस्य काय बोलतात ऐकू येते बाकीचे सदस्य काय बोलतात हे कसे ऐकू येत नव्हते.12-22 मिनिटींनी गोधळ सुरू झाला 12-30 मिनिटांनी मा. महापौरांचा धक्काबुक्की झाली त्यांचा बीपी वाढला त्यांना दवाखान्यात जावे लागले. त्यानंतर नियमानुसार मा.महापौर नसेल तर उपमहापौरांना पिठासीन अधिकारी म्हणून बसविले जाते. परंतु तसे पत्र उपमहापौरांना दिले होते का त्यांची आपण वाट बघीतली का तसेच ज्येष्ठतम सदस्य म्हणून पिठासीन अधिकारी म्हणून श्री.अ.रशिद खान मामू बसले त्यांना मतदान करण्याचा अधिकार आहे का? जे पिठासीन अधिकारी म्हणून बसतात त्यांना मतदान करता येत नाही असे नियमात आहे. तसेच मतमोजणीसाठी ज्या कॅडरचे अधिकारी पाहिजे त्यांना किमान चार दिवस अगोदर पत्र देवून मतमोजणीसाठी बोलविले होते काय? श्री.अयुबखान यांना पत्र दिले याचा सुध्दा खुलासा करावा.

श्री.संजय जोशी :पहिल्यांदा आम्हाला आमच्या प्रश्नाचा खुलासा पाहिजे.

(या वेळी सभागृहात एक पेक्षा जास्त सदस्य मोठयाने बोलतात त्यामूळे स्पष्ट ऐकू येत नाही.)

मा.सभापती : एका वेळेस एकाच सदस्यांनी आपले मत मांडावे. जेणे करून कोण काय बोलत आहे हे कळेल.

श्री.जावेद हसन खान : पिठासीन अधिकारी म्हणून श्री.अ.रशिद खान मामू यांना बसवायच्या अगोदर मा. महापौर यांची वाट बघीतली होती. ते आले नाही.

श्री.मोहन मेघावाले : प्रत्येक सदस्यांना आपआपले मत मांडू द्यावे.

श्री.वसंत नरवडे :आताच स. सभासंदानी जे आरोप केले. त्या आरोपाचे खंडण करण्या करीता उभा आहे. मलाही माझे मत माडू दयावे सर्वाचे सुचना ऐकल्यानंतर खुलासा होईलच. आताच म्हटले की तीनच सदस्यांचे नाव इतिवृत्तात आले इतिवृत्तात कुणाचे नाव आले कुणाचे नाही अजूनही पाहिलेले नाही.या विषयामध्ये जी निवडणुक झाली त्यात 12-22 वाजता अमुक झाले 12-50 वाजता अमुक झाले आताच काही सदस्यांनी प्रश्न केला की उपमहापौरांना बोलावले का ?उपमहापौर यांना बोलविण्याचा अधिकार

मा.महापौरांना प्रशासनाला होता सर्वसामान्य सदस्यांचा नव्हता माईक तोडले गेले ते तुम्ही तोडले की आम्ही.

श्री.संजय जोशी :प्रशासनाकडून उत्तर पाहिजे. मध्यास्थाकडून नाही नियमाने सुचक अनुमोदक देवून बसविता येत नाही सदस्यांनी खुलासा देवू नये स्चतःचे मत मांडावे.

याच वेळी अनेक सदस्य बोलतात.

श्री.वसंत नरवडे :असे आरोप करणे योग्य नाही. आम्ही माईक तोडला नाही.

श्री.संजय जोशी : कुणावर आरोप केलेले नाही निनावी बोललो आहे.

श्री.रविकांत गवळी :कुणी माईक तोडले यात कुणाचे नाव घेतलेले नाही.

श्री.संजय जोशी :सुचक व अनुमोदक म्हणून नाव घेतलेले आहे नियमाने या ठिकाणी सुचक व अनुमोदक देवून पिठासीन अधिकारी बसवता येत नाही.

श्री.अ.रशिद खान :पिठासीन अधिकारी बसू नये म्हणून कोर्टात गेले. मा.न्यायालय हे थोडी विचारणार आहे. आताच म्हटले की मा. महापौर यांना धक्काबुक्की केली तसे झाले नाही. पिठासीन अधिकारी म्हणून मी मतदान केले नाही उठून बाजूला होवून सदस्य म्हणून मतदान केलेले आहे.हात वर करून मतदान झाले.

श्री.संजय जोशी :हे सर्व सिडीमध्ये आलेले आहे. प्रशासनाकडून खुलासा पाहिजे.

श्री.वसंत नरवडे :जे काही मत माडांयचे आहे ते मा.न्यायालयात मांडावे मा.न्यायालयाने या संदर्भात याचिका दाखल करून घेतली आहे. त्यावर या ठिकाणी चर्चा करणे योग्य नाही-

श्री.रविकांत गवळी :आताच बोलले की बाजूला जावून मी मतदान केले त्यानंतर पिठासीन अधिकारी म्हणून सभापती पदाचे उमेदवार घोषित केले.प्रकरण न्यायालयात गेले

श्री.अ.रशिद खान : हात वर करून मतदान झाले.मतदान हे ओपन होते. सदस्य म्हणून मतदान केले आहे.

श्री.वसंत नरवडे :मा.न्यायालयाने कामकाजाला स्थागिती दिलेली नव्हती.

श्री.संजय जोशी : प्रशासनाकडून खुलासा पाहीजे.

मा.सभापती :सचिव हे सभाध्यक्षाच्या अधिपत्त्याखाली काम करतात.

श्रीमती जयश्री किवळैकर :पहील्यांदा सचिवांनी खुलासा करावा.

(याच वेळी स. सदस्य आपआपसांत मोठमोठयाने बोलतात कोण काय बोलत होते स्पष्ट ऐकायला येत नव्हते.)

मा.सभापती :एका वेळेस एकाच सदस्यांनी बोलावे सर्वाना बोलण्याची संधी दिली जाईल.आता श्री.अ. रशिद खान मामू बोलतील.

श्री.अ.रशिद खान :त्या दिवशी जो गोंधळ घातला वृत्तपत्रात आले बीजीपीचे कार्यकर्ते होते पेपरमध्ये आले त्यांनी गोधंळ केलेला होता. निवडणूक सभा रद्य व्हावी अशी त्याची धारणा होती.

मा.सभापती :एका वेळेस एकाच सदस्यांनी बोलावे सर्वाना बोलण्याची संधी दिली जाईल.

श्री.संजय जोशी :आम्ही सभापती म्हणून तुम्हाला मानायला तयार नाही.

श्री.वसंत नरवडे :मा.न्यायालयाने कामकाज चालविण्यात स्थागिती दिलेली नाही सभेचे कामकाज चालू ठेवावे.

श्रीमती जयश्री किवळेकर:आम्ही सुध्दा या सभागृहाचे सदस्य आहोत विचारलेला खुलासा सचिवानी करावा.

मा.सभापती :सभापती म्हणून मी बसलेलो आहे सचिव हे माझ्या अंडरमध्ये आहे. जो पर्यत सभापती म्हणून मी आदेशील करीत नाही तो पर्यत ते खुलासा करू शकत नाही.

श्री.अ.रशिद खान :सभापती म्हणून मानायला तयार नसतील तर बैठकीला सदस्य का आले सभा ही सभापती यांनी बोलविलेली आहे सचिवांनी नाही.

मा.सभापती :आपणा सर्वांना सोबत घेवून काम करावयाचे आहे. यात कोण होते काय होते हे सर्व शहराला माहित आहे.

श्री.रविकांत गवळी : आताच म्हटले की बीजीपीचे कार्यकर्ते यांनी गोंधळ घातला वृत्तपत्रात आले.हे कितपत सत्य असू शकते.

श्री.अ.रशिद खान : पोलीस विभागाने पत्र दिले की बीजीपीचे कार्यकर्ते होते. कोर्टात सादर केले आहे.

श्री.संजय जोशी :आमचा मूळ विषय असा की त्या दिवशी पिठासीन अधिकारी हे अनधिकृतरित्या बसविल्या गेले.प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.अ.रशिद खान : पिठासीन अधिकारी अनधिकृत बसले नव्हते जे काय म्हणणे माडायचे ते आपण कोर्टात सादर केलेले आहे.आता कोर्ट ठरवील की लिगल की इन्नलिगल बसले होते.मा. न्यायालयात प्रकरण चालू आहे त्यावर खुलासा घेणे योग्य होणार नाही.

श्री.रविकांत गवळी : ठिक आहे हरकत नाही कोर्ट मॅटर चालू आहे परंतू पिठासीन अधिकारी यांना मतदान करण्याचा अधिकार आहे का? याचा खुलासा होणे गरजेचे आहे.

श्री.अ.रशिद खान : विषय क्र. 02 मंजूर करण्यात यावा.
श्री.रविकांत गवळी :अगोदर आमच्या प्रश्नाचा खुलासा करावा.
मा.सभापती : इतिवृत्त कायम करण्यात येत आहे.
श्री. संजय जोशी : ती बैठक झालेलीच नव्हती. कायम करू नये.
श्री.रविकांत गवळी : आमचा खुलासा झालेला नाही.

**ठराव :**

दिनांक **7/4/2008** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 03 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, एन-6 स्मशानभुमी ते सेंट्रलनाका तसेच मदनी चौक ते रोशनगेट पर्यंत 300 मी.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन 200-07 च्या दरसुची नुसार रक्कम रू.14,77,785/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्त यांनी स्थायी समिती समोर ठेवण्याची शिफारस केलेली आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षाच्या तरतुदी अंतर्गत करण्यात येणार आहे.

करीता अंदाजपत्रक रक्कम रू.14,77,785/- चे मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. सभापती : विषय पत्रिकेवर असलेले सर्व विषय व ऐनवेळचा एक विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-6 स्मशानभुमी ते सेंट्रलनाका तसेच मदनी चौक ते रोशनगेट पर्यंत 300 मी.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,77,785/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 04 :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्री.भरतकुमार मदनसिंग राठोड, मिश्रक, आरोग्य विभाग यांची आई श्रीमती लिलाबाई मदनसिंग राठोड यांच्या आजारावर रक्कम रू.6,28,941/- एवढा खर्च झालेला आहे. प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.5,94,056/- एवढी आहे. अनुज्ञेय रक्कमेच्या 80% रक्कम रू.4,75,244/-(अक्षरी रूपये चार लाख पंचाहत्तर हजार दोनशे चव्वेचाळीस फक्त) एवढया रक्कमेस मनपा वैद्यकीय परतावा विनियम परिपत्रक दि.9/12/1994 गंभीर आजार क्र.01 तीव्र हृदयरोगानुसार प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करीता अनुज्ञेय रक्कमेच्या 80% रक्कम रू. 4,75,244/-(अक्षरी रूपये चार लाख पंचाहत्तर हजार दोनशे चव्वेचाळीस फक्त) संबंधीतास अदा करण्यास विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.भरतकुमार मदनसिंग राठोड, मिश्रक, आरोग्य विभाग यांची आई श्रीमती लिलाबाई मदनसिंग राठोड यांच्या आजारावर झालेल्या खर्चापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय रक्कम रू.5,94,056/- च्या 80% रक्कम रू.4,75,244/-(अक्षरी रूपये चार लाख पंचाहत्तर हजार दोनशे चव्वेचाळीस फक्त) एवढी रक्कम (मनपा वैद्यकीय परतावा विनियम परिपत्रक दि.9/12/1994 गंभीर आजार क्र.01 तीव्र हृदयरोगानुसार) संबंधीतास अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 05 :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, डॉ.सलीम अलीसरोवर येथील वाहनतळ व प्रवेश फी वसुलीचा ठेका सन 2008-09 या सालाकरीता देण्यासाठी जा.क्र.मनपा/मामअ/401/2008, दि. 14-3-2008 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवुन दि.19-3-2008 रोजी बोली ठेवण्यात आली असता खालील व्यक्तींनी बोलीत भाग घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | गणेश कारभारी आघाव | रक्कम रू. 13,800/- प्रती माह |
| 2. | मीर साजेद अली | बोली बोलली नाही. |
| 3. | समीर सौदागर | रक्कम रू.13,850/- प्रती माह |

महानगरपालिकेने डॉ.सलीम अली सरोवर उद्यान प्रवेश व वाहनतळाचा फी वसुलीचा ठेका देण्यासाठी आधारभुत किंमत रू.13,750/- ग्राह्य धरली असता श्री.समीर सौदागर यांनी रक्कम रू.13,850/- प्रती माह अशी जास्तीची बोली बोलली आहे. ज्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी श्री.समीर सौदागर यांना दिनांक 1-4-2008 ते 31-3-2009 या कालावधीसाठी प्रती माह रू.13,850/- चा ठेका देण्यासाठी अटी शर्तीस अधीन राहून प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.सलीम अलीसरोवर येथील वाहनतळ व प्रवेश फी वसुलीचा ठेका सन 2008-09 या सालाकरीता देण्यासाठी झालेल्या लिलाव बोलीनुसार श्री.समीर सौदागर यांना दिनांक 1-4-2008 ते 31-3-2009 या कालावधीसाठीअटी शर्तीस अधीन राहून प्रती माह रू.13,850/- चा ठेका देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 06 :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, रविवार आठवडी बाजार फी वसुलीचा ठेका दि.1-4-2008 ते 31-3-2009 कालावधीसाठी देण्यासाठी जा.क्र.मनपा/मामअ/401/2008, दि. 14-3-2008 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवुन दिनांक 14-3-2008 रोजी बोली ठेवण्यात आली असता खालील व्यक्तींनी बोलीत भाग घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | प्रितम गणेश हरवाल | रक्कम रू. 28,800/- प्रती बाजार |
| 2. | मीर साजेद अली मीर अहेमद अली | रक्कम रू. 23,300/- प्रती बाजार |
| 3. | दिपचंद मोहन रेसवाल | रक्कम रू.26,000/- प्रती बाजार |
| 4. | अशोक नंदलाल बियानी | रक्कम रू.28,900/- प्रती बाजार |

महानगरपालिकेने सदरील बाजारासाठी आधारभुत किंमत प्रती बाजार रू.23,100/- ठेवली आहे. श्री.अशोक नंदलाल बियानी यांनी प्रती बाजार रू.28,900/- प्रती बाजार अशी जास्तीची बोली बोलली आहे. ज्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी श्री.अशोक नंदलाल बियानी यांना रक्कम रू.28,900/- प्रती बाजार फी वसुलीचा दिनांक 1-4-2008 ते 31-3-2009 या कालावधीसाठी ठेका देण्यासाठी अटी शर्तीस अधीन राहून प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रविवार आठवडी बाजार फी वसुलीचा ठेका दिनांक 1-4-2008 ते 31-3-2009 कालावधीसाठी देण्यासाठी झालेल्या लिलाव बोलीनुसार रक्कम रू.28,900/- प्रती बाजार प्रमाणे फी वसुलीचा दिनांक 1-4-2008 ते 31-3-2009 या कालावधीसाठी ठेका देण्यासाठी अटी शर्तीस अधीन राहून श्री.अशोक नंदलाल बियानी यांना ठेका देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 07 :</u>**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, संत एकनाथ रंगमंदीर वाहनतळ फी वसुलीचा ठेका बोली/निविदा पध्दतीने दि.1-4-2008 ते 31-3-2009 पर्यंत देण्यासाठी जा.क्र.मनपा/मामअ/401/2008, दि. 14-3-2008 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवुन दि.19-3-2008 रोजी बोली ठेवण्यात आली असता खालील व्यक्तींनी बोलीत भाग घेतला आहे.

1. समीर सौदागर — रक्कम रू. 13,550/- प्रती माह
2. गणेश कारभारी आघाव — रक्कम रू.13,600/- प्रती माह
3. सय्यद मुर्तझा अफसर — बोलीतभाग घेतला नाही.

महानगरपालिकेने संतएकनाथ रंगमंदिर वाहनतळ फी वसुलीचा ठेका देण्यासाठी आधारभुत किंमत प्रती माह रू.13,420/- ठेवली असता श्री. गणेश कारभारी आघाव यांनी रक्कम रू.13,600/- प्रती माह अशी जास्तीची बोली बोलली आहे. ज्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी श्री.गणेश कारभारी आघाव यांना दिनांक 1-4-2008 ते 31-3-2009 या कालावधीसाठी प्रती माह रू.13,600/- चा ठेका देण्यासाठी अटी शर्तीस अधीन राहून प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदीर वाहनतळ फी वसुलीचा ठेका बोली/निविदा पध्दतीने दि.1-4-2008 ते 31-3-2009 पर्यंत देण्यासाठी झालेल्या लिलाव बोलीनुसार, प्रती माह रू.13,600/- चा ठेका देण्यासाठी अटी शर्तीस अधीन राहून श्री.गणेश कारभारी आघाव यांना ठेका देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 08 :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.2 सुरेवाडी वसाहती अंतर्गत 100, 150, 200 मी.मी. व्यासाच्या डीआयके-9 जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.23,68,000/- चे तयार करण्यात आले असून त्यास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.1176/1 दि.26.10.2007 अन्वये मान्यता झालेली आहे. त्यानुसार ई-टेंडरींग विभागामार्फत निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत 1 निविदा विक्री झाली व स्विकारण्याच्या अंतिम तारखेला एक निविदा प्राप्त झाली. ती खालील प्रमाणे.

1. श्री सुरेश बी साधवानी — अं.प.दरापेक्षा 49.10% जास्त दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदा श्री सुरेश बी साधवानी यांची असून अं.प.दरापेक्षा 49.10% जास्त दराची आहे. त्यास मा. आयुक्त यांची शिफारस झालेली आहे.

तरी श्री.सुरेश बी साधवानी यांची अं.प.दरापेक्षा 49.10% जास्त दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.2 सुरेवाडी वसाहती अंतर्गत 100, 150, 200 मी.मी. व्यासाच्या डीआयके-9 जलवाहिनी टाकण्यासाठी प्राप्त झालेली श्री. सुरेश बी. साधवानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 49.10% जास्त दराची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 09 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वशिक्षा अभियानांतर्गत हर्सूल गांव येथे दहा वर्गखोल्या बांधणे करीता रक्कम रूपये 25,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च, सर्व शिक्षा अभियानांतर्गत रक्कम रू.17.00 लक्ष व उर्वरीत रक्कम रू. 8.00 लक्ष मनपा फंडातून खर्च करण्यात येणार आहे. प्रकरणी विशेष बाब म्हणून महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचेकडून सदरील कामास्तव निविदा पध्दती अवलंबणेकरीता विशेष परवानगी घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा विक्री झाल्या व स्विकारणेच्या दिनांकास दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

1. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन — 27.33% जास्त दराने
2. संजय लक्ष्मणदास चिचाणी 52% जास्त दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदानुसार तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27.33% जास्त दराची निविदा रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली होती. त्यानुसार संबंधीत गुत्तेदारास दराच्या वाटाघाटीस्तव मा.आयुक्त यांचे दालनात बोलाविण्यात आले असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27.33% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.00% जास्त दराने काम करण्यास संबंधीत गुत्तेदार यांनी संमती दर्शविली असून मा.आयुक्त यांनी त्यास मा.स्थायी समिती सभेकडे सादर करण्याबाबत शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदरील काम रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27.33% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.00% जास्त दराने करून घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वशिक्षा अभियानांतर्गत हर्सूल गांव येथे दहा वर्गखोल्या बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.00% जास्त दराने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 10 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.47 मधील एन-6 सेक्टर एफ व ई येथील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामासाठी रक्कम रू.20,70,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदरील अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.21 दि.20.12.2007 अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश 23.50% कमी दराने
2. आदीनाथ कन्स्ट्रक्शन 15.30% कमी दराने
3. उदय इंजिनिअरींग वर्क्स 14.99% कमी दराने
4. नागोराव माणिकराव सरोवर 13.00% कमी दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदानुसार तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 23.50% कमी दराची टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.47 मधील एन-6 सेक्टर एफ व ई येथील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 23.50% कमी दराची टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. 11 :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, Computerization for collection of Cess imposed, assessed and levied by the Corporation on the entry of goods within the Corporation limits of Aurangabad Under the Provision of the Bombay Provincial Municipal Corporations Act 1949 and the rules framed there under on PPP Basis. या कामासाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविल्या असता पाच निविदा विक्री झाल्या व चार निविदा प्राप्त झाल्या, प्राप्त निविदाधारक खालील प्रमाणे आहेत.

1. Soft Infoservices तर्फे श्री. सचिन शेटे
2. M/s Eminence तर्फे श्री. संजय घाटगे
3. Dhwangale Infotech तर्फे श्री.जितेंद्र खताळकर
4. Vansh Infotech तर्फे श्री.नितीन मुळे

उक्त निविदाधारकांपैकी निविदेत नमूद पात्रतेचे निकष Soft Infoservices तर्फे श्री.सचिन शेटे व M/s Eminence तर्फे श्री. संजय घाटगे हे पूर्ण करीत नसल्याचे त्यांच्या तांत्रिक निविदेवरून स्पष्ट झाले. निविदेत नमूद पात्रतेचे निकष Dhawangale Infotech व Vansh Infotech हे पूर्ण करत असल्यामुळे त्यांच्या व्यापारी निविदा उघडण्यात आल्या, प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि.<br>Rate per registration of dealer of cess | Rs. 720/-<br>(Inwords Rupees Seven hundred twenty only) |
| | Charges per delivery of notice | Rs. 05/-<br>(Inwords Rupees Five only) |
| 2. | वंश इन्फोटेक प्रा.लि.<br>Rate per registration of dealer of cess | Rs. 690/-<br>(Inwords Rupees Six hundered ninety only) |
| | Charges per delivery of notice | Rs. 05/-(Inwords Rupees Five only) |

तुलनात्मकदृष्ट्या वंश इन्फाटेक प्रा.लि. यांचे दर कमी असल्याने त्यांना दराच्या वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. वाटाघाटी अंती खालील दर निश्चित करण्यात आले आहेत.

| | |
|---|---|
| वंश इन्फोटेक प्रा.लि.<br>Rate per registration of dealer of cess | Rs. 675/-<br>(Inwords Rupees Six hundered seventy five only) |
| Charges per delivery of notice | Rs. 05/- (Inwords Rupees Five only) |

मा. आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समिती समोर मान्यतेसाठी शिफारस केली आहे. वंश इन्फोटेक प्रा.लि. यांच्या दरास मान्यता होण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे Computerization for collection of Cess imposed, assessed and levied by the Corporation on the entry of goods within the Corporation limits of Aurangabad Under the Provision of the Bombay Provincial Municipal Corporations Act 1949 and the rules framed there under on PPP Basis. या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदा धारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम वंश इन्फोटेक प्रा.लि. यांचे मार्फत खालील दर्शविलेल्या दरानुसार करून घेण्यास मंजुरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| Rate per registration of dealer of cess | Rs. 675/- (Inwords Rupees Six hundered seventy five only) |
| Charges per delivery of notice | Rs. 05/- (Inwords Rupees Five only) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगिता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद